# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(विशेष)

**दिनांक २२.०५.२०२६ शुक्रवार**

**नागपुर शहर पोलीस आयुक्तालय वतीने आयोजीत, चिमुकल्यांसाठी असलेल्या समर कॅम्प–२०२६ चा समारोप :–**

डॉ. श्री. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे संकल्पनेतुन, नागपुर शहर पोलीस आयुक्तालय मार्फतीने पोलीस अधिकारी व अंमलदार यांची मुले–मुली तसेच, सर्वसामान्य नागरीकांचे पाल्यांसाठी दिनांक ०४.०५.२०२६ ते दिनांक २२.०५.२०२६ दरम्यान, पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, नागपुर येथील चिमणीघर येथे समर कॅम्प २०२६ चे आयोजन करण्यात आलेले होते.

समर कॅम्प चा समारोप समारंभ आज दिनांक २२.०५.२०२६ रोजी १६.०० वा. मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेत व प्रमुख उपस्थितीत पार पडला. समर कॅम्प समारोप प्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांचे रोपटे देवुन स्वागत करण्यात आले व कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली.

कार्यक्रम प्रसंगी पोलीस हवालदार अतुल आगरकर यांनी कार्यक्रमाची प्रास्तावना सादर करतांना सांगीतले की, समर कॅम्प मध्ये दोन वर्गीय वयोगटामध्ये विभागणी करण्यात आलेली होती. ज्यामध्ये, १) ४ ते ७ वर्षे २) ८ ते १४ वर्षे असा समावेष होता. समर कॅम्पमध्ये मुलांसाठी इनडोअर आणि आऊटडोअर ज्यामध्ये प्रामुख्याने क्रिडा स्पर्धा, नृत्य, कला, हस्तकला, साहशी खेळ, मॉकड्रिल, प्रथमोपचार प्रशिक्षण, पोलीस ठाणे व ट्रॉफीक पार्क भेटी तसेच, वरीष्ठ पोलीस अधिकारी तथा पोलीस अंमलदार यांसोबत सुसंवाद अशा प्रकारचे वेगवेगळ्या उपक्रमांचा समावेश होता. या समर कॅम्पचे घोषवाक्य ‘‘A SUMMER TO LEARN’’ असा असुन, मुख्य उद्देश मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, टिमवर्क तसेच, सामाजिक जाणिव याविषयी सकारात्मकता व सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करून, मुलांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. या समर कॅम्पकरीता विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. तसेच, मा. पोलीस आयुक्तांचे उपस्थीतीत सर्व चिमुकल्यांना सपोनि. श्री. विजय गिते यांचे मार्फतीने सामुहीक चांगल्या सवयी तथा वर्तणुकीबाबत शपथ देण्यात आली.

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी ‘‘किड्स एज न्युज चॅनेल’’ चे चिमुकले कुमार मनन याचे प्रश्नांना आणि कुमारी आनंदी हिचे वेगवान प्रश्नमंजुषा ला उत्तरे देताना, सर्व उपस्थितांचे मने जिंकली. तसेच, उपस्थीतांना मार्गदर्शन सुध्दा केले. तसेच, आपल्या अध्यक्षीय भाषणादरम्यान, समर कॅम्प ज्यांचे विशेष सहभागाने पार पडला, त्या सर्वांचे प्रमाणपत्र व मोमेंटो देवुन स्वागत केले. त्याचप्रमाणे समर कॅम्पमध्ये सहभागी चिमुकल्यांचे स्वागत केले. सर्व उपस्थित पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे परीवार यांनी समारोपप्रसंगी मोठ्या संख्येने हजर राहुन मुलांचे सर्वांगीण वाढीसाठी जागरूकता दाखविलेबाबत त्यांचेही स्वागत केले. त्याचप्रमाणे, मुलांनी शारीरिक खेळ खेळुन आपले आरोग्य जपावे आणि अभ्याप्रती नेहमी तत्पर राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, इंटरनेट, यु–टयुब, इन्स्टाग्राम आणि स्नॅप चॅट यांसारख्या सोशल मिडीया पासुन

लांब राहुन, पुस्तके वाचन, खेळ, छंद जोपासणे इ. गोष्टीवर भर देणेबाबत आणि किशोरावस्थेत अंमली पदार्थांपासुन दुर राहणेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समारोप करतांना, मा. पोलीस आयुक्त यांनी समर कॅम्प दरम्यान विशेष कामगिरी करणाऱ्या तथा सहभागी चिमुकल्यांना प्रमाणपत्राचे वितरण सुदधा केले. समर कॅम्प करीता विशेष योगदान देणारे सोनी दाम्पत्य श्रीमती प्रिन्सी सोनी व श्री. अनुराग सोनी यांनी मोलाची जबाबदारी पार पडल्याबाबत तथा श्री. विनोद तिवारी (रा.पो.नि.) यांनी या समर कॅम्पकरीता आपले अखत्यारीत चिमणी घर येथे जातीने लक्ष देवुन, जबाबदारी पार पडल्याबाबत त्यांचे व त्यांच्या टिमचे प्रमाणपत्र व मोमेंटो देवुन विशेष अभिनंदन केले.

समारोप प्रसंगी समर कॅम्प मध्ये सहभागी मुली–मुले यांचे पालकांनी समर कॅम्प हा उत्कृष्ठ रितीने पार पडला, मुलांनी खुप मज्जा केली, मोबाईल पासुन दुर राहीले, घरातील खोड्या करण्यापासुन दुर राहुन नविन शिकण्याचा अनुभव प्राप्त केला असे सांगुन, मा. पोलीस आयुक्तांचे विशेष आभार मानले व असे उपक्रम सतत राबविणेबाबत आशा व्यक्त केली.

''समर कॅम्प–२०२६ समारोप'' कार्यक्रमादरम्यान, मा. पोलीस उपायुक्त (वाहतुक), नागपुर शहर, मा. सहायक पोलीस आयुक्त (वाहतुक शाखा), मा. राखीव पोलीस निरीक्षक (मुख्यालय) तसेच, पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे परीवारातील सदस्य मोठ्या संख्यने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पो. हवा. श्री. अतुल आगरकर यांनी तर आभार प्रदर्शन सपोनि. श्री. विजय गिते यांनी केले.







**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**